LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष २७ — पुणें, बुधवार तारीख १ फेब्रुवारी, १९६१ — अंक ३

## विविध माहिती

**उसाची शेती सरकारी करा**— साखर कारखान्यांच्या उसाच्या शेतीवर काम करणाऱ्या कामगारांची परिषद पुणें येथें भरली होती. परिषदेतर्फे राज्य सरकारला एक निवेदन पाठविण्यांत आलें आहे. साखर कारखान्यांकडे असलेल्या जमिनीला जमिनीच्या कमाल धारणेचें बिल लागूं करण्यांत आल्यावर ही शेती सरकारी शेती म्हणून चालविण्यांत यावी अशी सूचना निवेदनांत करण्यांत आली आहे. त्यामुळें उसाचें उत्पादन पूर्वीप्रमाणेंच राहील असेंहि सांगण्यांत आलें आहे.

**गुजरातमधील विश्रांतिस्थान**— गुजरात राज्यांतील विरमगांव तालुक्यामधील नाल सरोवराच्या कांठीं एक विश्रांतिस्थान उभारण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. ह्या ठिकाणीं प्रवाशांना राहण्यासाठी २४ खोल्या बांधण्यांत येणार आहेत. सरोवरांत जलविहार करण्यासाठीं बोटीहि ठेवण्यांत येतील. हें सरोवर १२ मैल लांब व ३ मैल रुंद आहे.

**भारी वजनाची विजेची यंत्रसामग्री**— हिंदमध्यें भारी वजनाच्या विजेच्या यंत्रसामग्रीचें उत्पादन करणारे आणखी दोन कारखाने काढण्यांत येणार आहेत. एक कारखाना उत्तर प्रदेशांत व दुसरा मद्रास राज्यांत काढला जाण्याचा संभव आहे. एका कारखान्यासाठी रशिआकडून ५ कोटी रुपये कर्ज मिळणार असून दुसऱ्या कारखान्यासाठी झेकोस्लोव्हाकिआकडून ४५ कोटी रुपये मिळणार आहेत.

**पानिपतचें तिसरें युद्ध**—मराठशाही व अहमदशाहा अबदाली ह्यांच्या दरम्यान १७६१ सालीं झालेल्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धाच्या दुसऱ्या सांवत्सरीनिमित्त पंजाब विद्यापीठातर्फे एक ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ह्या लढाईसंबंधीं आजतागायत प्रसिद्ध न झालेली अशी बरीच माहिती ग्रंथांतील लेखांत एकत्र करण्यांत आली आहे.

**जपानमधील सर्वांत मोठें धरण**—मध्य जपानमध्यें बांधण्यांत येत असलेल्या सर्वांत मोठ्या धरणाचें काम पुरें झालें आहे. धरणावरील जलविद्युत्केंद्राची नुकतीच चांचणी करण्यांत आली. ह्या केंद्रांत २ लाख, १५ हजार किलोवॅट वीज तयार होईल. धरण पूर्ण करण्यास ४ वर्षे लागलीं. धरणाच्या भिंतीची उंची १३१ मीटर्स आहे.

**सुरत म्युनिसिपालिटीचें कर्ज**—सुरत म्युनिसिपालिटीनें रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी गुजरात सरकारकडून २० लाख रुपये कर्ज काढण्याचें ठरविलें आहे. कर्जावर ४·७५ टक्के व्याज देण्यांत येणार असून त्याची फेड १२ सारख्या वार्षिक हप्त्यांनीं करण्यांत यावयाची आहे.

**अणुबाँब टाकणारा वेडा झाला**—हिरोशिमा ह्या जपानी शहरावर अणुबाँब टाकणारा अमेरिकन वैमानिक मि. ददर्ले ह्याला कांहीं वर्षांपासून वेडाचे झटके येत असतात. गुन्हे केल्याबद्दल त्याला कांहीं शिक्षाहि झालेल्या आहेत. शहरावर बाँब टाकून लाखों लोकांना भयानक रीतीनें मृत्युमुखीं पाठविल्याबद्दल आपण स्वतःच गुन्हेगार आहोंत अशी त्याची समजूत झालेली आहे. अणु बाँबचा शोध लावण्यास मदत करणाऱ्या कांहीं शास्त्रज्ञांनाहि असेंच वाटत आहे.

**कॉलेजच्या स्थापनेला विद्यार्थ्यांची मदत**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मध्य प्रदेशांत एक वैद्यकीय कॉलेज स्थापन करण्यांत येणार आहे. त्याच्या स्थापनेसाठी राज्यसरकार व मध्यवर्ती सरकार मदत देतीलच; पण त्याशिवाय कॉलेजांत शिकूं इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याकडून ५,००० रुपये घेण्यांत येणार आहेत. अशा पद्धतीनें आंध्र व केरळ राज्यांत एक एक वैद्यकीय कॉलेज स्थापन करण्यांत आलें आहे.

**नांदेड येथें विमानतळ**— मराठवाड्यांतील नांदेड ह्या ठिकाणीं विमानतळ बांधण्यांत येणार आहे. ह्या कामासाठीं २·५० लाख रुपये लागतील असा अंदाज आहे. विमानतळाचें काम सुरू झालें असून तो येत्या ऑगस्ट महिन्यांत पुरा होण्याची शक्यता आहे. विमानांना उतरण्यासाठी बांधण्यांत येणाऱ्या धसरपट्टीची लांबी ६ फर्लांग व रुंदी २०० फूट असेल. उतारूंच्या सोयीसाठी एक विश्रामस्थानहि बांधण्यांत येणार आहे.

**वीजनिर्मितीसाठी यंत्रसामग्री**—कुंदा जलविद्युत् निर्मितीकेंद्रासाठी लागणारी यंत्रसामग्री घेण्याबाबत कॅनडाच्या सरकारशीं करार करण्यांत आला आहे. सध्यां ही योजना तिसऱ्या टप्प्यापर्यंत आली आहे. वीजनिर्मितीची ही योजना कोलंबो-मदत योजनेखाली हातीं घेण्यांत आलेली आहे. तिसऱ्या टप्प्याचें काम पूर्ण करण्यासाठी लागणारी सर्व यंत्रसामग्री कॅनडाकडूनच मिळण्यांत येईल.

**साखरेच्या धंद्याचें नुकसान होईल**—महाराष्ट्र सरकारनें प्रसिद्ध केलेल्या जमीनधारण बिलामुळें साखरेच्या धंद्याचें नुकसान होईल, असें मत एक उद्योगपति श्री. ढहाणूकर ह्यांनीं व्यक्त केलें आहे. साखर-कारखान्यांची जमीन शेतकऱ्यांना वाटून देण्यांत आली तर दर एकरीं उसाचें पीक कमी होईल. वैयक्तिक शेतकऱ्यांना ऊंस चांगल्या रीतीनें पिकवितां येणार नाहीं, अशी भीति त्यांनीं व्यक्त केली.

**ओरिसामधील मँगेनीझच्या खाणी**—ओरिसा माइनिंग कॉर्पोरेशननें १९६१ सालापासून मँगेनीझ व क्रोमाइट धातूंच्या खाणी चालविण्याचें ठरविलें आहे. आतांपर्यंत कॉर्पोरेशन फक्त लोखंडाच्या खाणींच चालवीत असे. जपानला निर्यात करण्यासाठी १ लाख टन अशुद्ध लोखंड पुरविण्याचा करार कॉर्पोरेशननें स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनशीं केला आहे.

**ग्रामीण भागासाठी विमा—योजना**—ग्रामीण भागांतील लोकांसाठी एक विमा—योजना चालू करण्याचा विचार मध्यवर्ती सरकारचें समाज विकास व सहकार खातें करीत आहे. विम्याचें काम पंचायतीमार्फत करण्यांत येणार असून त्यामुळें पंचायतींना कमिशनचें उत्पन्न मिळणार आहे. ह्याबाबत आयुर्विमा कॉर्पोरेशन व खातें ह्यांच्या दरम्यान सध्यां वाटाघाटी चालू आहेत. पंचायतीमधील लोकांना कॉर्पोरेशनतर्फे शिक्षण देण्यांत येईल.

**खताच्या कारखान्यांतील उत्पादन**—सिंद्री येथील खताच्या कारखान्याचा विस्तार करण्यासाठी कांहीं नवीन यंत्रसामग्री बसविण्यांत आली होती. परंतु ती नीट काम देत नसल्यामुळें कारखान्याची उत्पादनक्षमता ४० टक्क्यांनीं घटली आहे. कारखान्याला तांत्रिक सल्ला देणारे परदेशी तज्ज्ञ यंत्रसामग्री दुरुस्त करण्यास बांधलेले आहेत. पण दुरुस्ती होण्यास वेळ लागणार आहे.

**रशिआ—क्यूबा व्यापार**—१९६१ सालीं रशिआ क्यूबाला मोठ्या प्रमाणावर अशुद्ध तेल पुरविणार आहे. त्याशिवाय धान्य, कापूस, मोटार ट्रक्स, यांत्रिक हत्यारें, इत्यादि पुरविण्याचाहि करार रशिआनें केला आहे. उलटपक्षी, क्यूबा रशिआला मुख्यतः साखर देणार आहे. अमेरिकेनें क्यूबाची साखर घेण्याचें बंद केल्यानें क्यूबा अडचणींत आला होता.

**भाताची यांत्रिक पद्धतीनें लागवड**—कलकत्ता येथील राष्ट्रीय शेतीप्रदर्शनांत पश्चिम जर्मनीनें भाग घेतला आहे. भारतामधील छोट्या शेतांना उपयोगी पडेल अशा तऱ्हेनें मंडपाची योजना करण्यांत आली आहे. ४०० चौरस मीटरच्या एका तुकड्यांत भातलावणीची यांत्रिक पद्धति दाखविण्यांत आली आहे. तीन गाईंच्या साह्यानें चालविण्यासारखी डेअरी व रूरकेला येथें तयार झालेलें रासानिक खतहि मंडपांत ठेवण्यांत आलें आहे.

**हैड्रोजनच्या ढगाचा फोटो**—फ्रान्समधील दोघा खगोलशास्त्रज्ञांनीं पृथ्वीपासून २६ हजार प्रकाशवर्षें दूर असलेल्या हैड्रोजन वायूच्या ढगाचा फोटो घेण्याची करामत केली. त्यासाठी त्यांना आपल्या टेलिस्कोपची शक्ति २५ पटीनें वाढवावी लागली. विश्वाच्या ह्या अज्ञात भागांचा फोटो घेण्यासाठी तीन तास थांबावें लागलें.

**युगोस्लाव्हिआचें पाकिस्तानला कर्ज**—पाकिस्तानमधील निरनिराळ्या विकास योजना पार पाडण्यास मदत म्हणून युगोस्लाव्हिआनें पाकिस्तान सरकारला १ कोटी डॉलर्सचें कर्ज देऊं केलें आहे. कर्जाचा उपयोग करून पाकिस्तान युगोस्लाव्हिआंत जरूर ती यंत्रसामग्री विकत घेणार आहे. कर्जाबद्दलच्या अटी प्रे. अयुबखान ह्यांच्या युगोस्लाव्हिआच्या भेटींत ठरतील.

**साखरेची आणखी निर्यात**—कांहीं महिन्यांपूर्वी ५०,००० टन साखर निर्यात करण्याची परवानगी भारत सरकारनें इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनला दिली होती. आतां आणखी ५०,००० टन निर्यात करण्याची परवानगी देण्यांत आली आहे. ही साखर ३१ मार्चपूर्वी निर्यात करावयाची आहे. आतांपर्यंत ३९,००० टन साखरेच्या निर्यातीबद्दल करार करण्यांत आले आहेत.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८३.

**सूचना**

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींच्या दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१–७–५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक



## बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल ... | रु. १२,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन ( संचालक, सकाळ )
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवीवर आकर्षक व्याज.

...शाखा..

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस :
४५५ रविवार पेठ, पुणें

गो. गं. साठे
मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १ फेब्रुवारी, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


### पैसे गुंतविणाऱ्या 'छोट्या' माणसाचें महत्त्व

भारतांत अलीकडे लहान प्रमाणावर पैसे गुंतविणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. नवीन कंपन्यांच्या भांडवल विक्रीला प्रारंभ झाला कीं पुष्कळदा कंपनीला पाहिजे असेल त्यापेक्षा अधिक रकमेचे शेअर्स घेण्यासाठीं अर्ज येत असतात. ह्या अर्जदारांत बराच मोठा भरणा बचत करून थोडेसे पैसे शिल्लक टाकणाऱ्यांचा असतो. हीच आर्थिक प्रवृत्ति ब्रिटनमध्येंहि दिसून येत आहे. ब्रिटनमध्येंहि आर्थिकदृष्ट्या सामान्य प्रतीचा माणूस उद्योगधंद्यांत अधिकाधिक पैसे गुंतवीत आहे. ब्रिटनमधील राहाणीचें मान दिवसांनुदिवस वाढत चाललें आहे. त्यामुळें बचत करण्यासारख्या पैशाची थोडी अधिक सुलभता झाली आहे. अधिक पैसा हातीं आल्यामुळें त्यापैकीं कांहीं भाग पाहिजे असलेल्या वस्तू हप्त्यानें घेण्याकडे खर्च केला जातो, कांहीं हिस्सा घरें बांधण्यासाठीं अगर विकत घेण्यासाठीं खर्च केला जातो, कांहीं पैसा विमा उतरण्याकडे खर्च केला जातो व विमा-व्यवसायाच्याद्वारां तो उद्योगधंद्यांत गुंतविला जातो. बेताचें उत्पन्न असलेल्या लोकांकडून उद्योगधंद्यांत पैसे गुंतविले जाण्यास आणखीहि एक कारण आहे. ब्रिटनमध्यें गेल्या कांहीं वर्षांत आर्थिक व्यवहारांविषयीं माहिती देणारीं नियतकालिकें वाढलेलीं आहेत. त्यामुळें सामान्य माणसालासुद्धां पैसा कसा गुंतविला जावा ह्याविषयीं कांहीं कल्पना आलेल्या आहेत. त्याच्या ह्या जाणिवेंतूनच कंपन्यांच्या शेअर्समध्यें पैसा गुंतविण्याची वृत्ति उत्पन्न झाली आहे. भारतामधील सामान्य माणसालाहि बचत करून पैसे उद्योगधंद्यांत गुंतविणें शक्य आहे. मात्र त्यासाठी चलनवृद्धीला आळा घालून झालेली बचत उधळून न टाकण्याची काळजी घेतली पाहिजे.

---

### राष्ट्रा-राष्ट्रांमधील संशयाच्या भावनेवर उपाय

शांतता म्हणजे दोन युद्धांतील कालखंड, अशी कांहींशी निराशाजनक व्याख्या करण्यांत आलेली आहे. ही व्याख्या सामान्य माणसाच्या दृष्टीनें फारशी चूक आहे असें म्हणतां येणार नाहीं. युद्धाच्या घोर परिणामाची सर्वांत अधिक झळ सामान्य माणसांनाच लागते. तेव्हां मामुली रीतीनें जीवन जगूं इच्छिणाऱ्या ह्या सामान्याला युद्ध टाळण्यासाठीं कांहीं करतां येईल किंवा नाहीं ? ह्या बाबतींत डॉ. डोनाल्ड वॅट ह्यांनीं कांहीं एक उपक्रम २७ वर्षांपूर्वीं हातीं घेतला आहे. डॉ. वॅट ह्यांनीं आंतरराष्ट्रीय सहजीवनाचा प्रयोग करून पाहणारी एक संस्था काढलेली आहे. आपल्या प्रयोगाविषयीं मुंबई येथें बोलतांना ते म्हणाले कीं परक्या लोकांच्या जीवनाच्या घाटणीविषयीं बहुधा सगळीकडेच अज्ञान व गैरसमज पसरलेले असतात. त्यामुळें निरनिराळ्या देशांत राहणाऱ्या लोकांत परस्परांविषयीं संशयाची, व अविश्वासाची भावना वाढीस लागते. ही परिस्थिति राष्ट्राराष्ट्रांत युद्धें होण्यास फार पोषक ठरते. आंतरराष्ट्रीय मैत्री आणि सद्भावना ह्यांची जोपासना करण्यासाठीं एका देशांतील तरुण-तरुणींनीं दुसऱ्या देशांतील कुटुंबांतून राहण्यास गेले पाहिजे. त्यामुळें संबंधित देशामधील लोकांत भावनात्मक संबंध निर्माण होण्यास मदत होईल, आणि प्रादेशिक अगर भौगोलिक मर्यादांचें महत्त्व कमी होत जाईल. सुमारें २७ वर्षांपूर्वीं १८ अमेरिकन विद्यार्थ्यांना आमच्या संस्थेतर्फे युरोपमधील कुटुंबांतून राहण्याची संधि देण्यांत आली. हे विद्यार्थी अशा रीतीनें एक महिनाभर राहिले. आतां दरसाल ३०० तरुण-तरुणींना अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय सहजीवनासाठी मदत करण्यांत येत असते. परदेशीय कुटुंबांतून राहण्याच्या ह्या प्रयोगांत रशियाचाहि समावेश करण्यांत आलेला आहे.

---

### फुटीर वृत्तीला आळा घालण्याचें महत्त्व

हिंदुस्थानच्या इतिहासावरून वरवर नजर फिरविणाऱ्याला एक गोष्ट अगदीं सहज लक्षांत येते. ह्या देशांतील लोकांत ऐक्याची भावना अनेक कारणांनीं नीटशी कधींच वाढीस लागली नाहीं. त्यामुळें देशांत परकीय राजसत्ता स्थापन करण्याच्या कामीं परक्या लोकांना फारसे श्रम करावे लागले नाहींत. इतिहासाचा हा धडा लक्षांत घेऊन भारताच्या जनतेला एकतेचें आवाहन करण्यांत येत असतें. इंग्रजी राजवटींत भारताचें कारभारविषयक ऐक्य साधलें गेलें आणि त्यांतूनच खऱ्या ऐक्यभावनेचा उदय झाला अशी समजूत करून घेण्यांत आली. परंतु राज्यपुनर्घटनेच्या निमित्तानें ही समजूत चुकीची असल्याचें दिसून आलें. भारताच्या घटक राज्यांतील परस्पर संबंध चांगले राहावेत व फुटीर वृत्तीला आळा बसावा म्हणून राज्यपुनर्घटना मंडळानें कांहीं शिफारसी केल्या आहेत. अखिल भारतीय स्वरूपाच्या ज्या नोकऱ्या असतील त्या नोकऱ्यांत काम करणाऱ्या लोकांपैकीं ५० टक्के लोक तरी त्या त्या राज्याच्या बाहेरील असावे अशी एक सूचना मंडळानें केली आहे. इंडिअन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस व आय. पी. एस. ह्या श्रेण्यांच्या बाबतींत ही शिफारस राज्य सरकारांनीं पाळल्याचें दिसून येतें. १९५७ सालापासून २६७ आय. ए. एस. अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यांत आल्या. त्यांपैकीं १६१ अधिकाऱ्यांच्या नेमणुका त्यांच्या मूळच्या राज्याच्या बाहेर करण्यांत आल्या. इंडिअन पुलिस सर्व्हिसमध्यें १८९ नव्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यांत आल्या. त्यांपैकीं ११४ नेमणुका अधिकाऱ्यांच्या मूळच्या राज्याच्या बाहेर करण्यांत आल्या. राष्ट्राचा कारभार चालवितांना भाषाविषयक अडचणी दुर्लंघ्य ठरत नाहींत, असें ह्यावरून दिसून येतें.

---

### बँक ऑफ इंडिया वसाहत

अंधेरी (मुंबई) येथील दि बँक ऑफ इंडिया स्टाफ को. सोसायटीच्या इमारतीचें उद्घाटन बँकेचे चेअरमन, सर कावसजी जहांगीर, ह्यांनीं रविवार, दि. १५ जानेवारी रोजीं केलें. बँकेनें सोसायटीला इमारतीसाठीं बिनव्याजी मोठें कर्ज देऊन नोकरांच्या राहण्याचा प्रश्न सोडविण्यास मदत केली आहे.

## तिसऱ्या योजनेंत ऊंसउत्पादनवाढीसाठी १२ कोटी रु. ची तरतूद

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ऊंस उत्पादनवाढीच्या योजनांसाठी १२ कोटी रु. ची तरतूद करण्यांत आली आहे. या विकास योजनांत ऊंसलागवडीच्या क्षेत्रांत थोडी वाढ होणार असली तरी दर एकरीं उत्पादनवाढीवर भर देण्यांत येईल. संशोधनासाठी तिसऱ्या योजनेंत १५ लक्ष रु. ची तरतूद करण्यास तात्पुरती मान्यता दिली आहे. १९५९-६० मध्यें साखरेचें उत्पादन २४·२२ लक्ष टन होऊन या बाबतींत नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे. सप्टेंबर १९६० मध्यें जाहीर केलेल्या ५०,००० टन निर्यात वांट्यापैकी आतांपर्यंत ३९,००० टन साखर निर्यात झाली असून ती मुख्यत्वें मलाया आणि मध्यपूर्व देशांत पाठविण्यांत आली. आणखी निर्यातीसाठी ५०,००० टन साखर मोकळी करण्याचें गेल्या महिन्यांत जाहीर करण्यांत आलें. आपली साखर अमेरिका खरेदी करूं शकेल किंवा कसें याचीहि माहिती मिळविण्यांत येत आहे. प्रचलित ७१ कारखान्यांना उत्पादनशक्ति वाढविण्यासाठी आणि ५३ नवे कारखाने सुरू करण्यासाठी परवाने देण्यांत आले. या ५३ नव्या कारखान्यांपैकी १९५९-६० च्या हंगामापर्यंत ३१ कारखाने आणि चालू हंगामांत आणखी तीन सुरू झाले. ३४ चालू कारखान्यांतील विस्तारयोजनांचें काम पुरें झालें आहे. देशांत १९६५-६६ पर्यंत सुमारें ३० लक्ष टन साखर लागेल असा अंदाज तिसऱ्या योजनेसाठी या धंद्याच्या विकास कार्यक्रमाची शिफारस करतांना धरलेला होता. या धंद्याची उत्पादनशक्ति ३५ लक्ष टनांपर्यंत वाढवायची, असें ठरविण्यांत आलें आहे.

---

## हिंदच्या आर्थिक विकासाला अणुशक्तीचें साह्य

भारताचा औद्योगिक व आर्थिक विकास घडवून आणण्याचें कार्य पंचवार्षिक कार्यक्रमांच्या द्वारां चालू करण्यांत आलेलें आहे. इतर देशांच्या औद्योगीकरणाचा इतिहास भारताहून अर्थातच वेगळा आहे. पश्चिम युरोपांतील देश व अमेरिका ह्यांची औद्योगिक प्रगति क्रमाक्रमानें होत गेली. भारताला हेंच काम लवकर करावयाचें आहे. शिवाय २० व्या शतकाच्या दुसऱ्या अर्धात औद्योगिक क्रांतीचीं साधनेंहि बदललेलीं आहेत. औद्योगीकरणाच्या नेहमींच्या साधनांशिवाय अणुशक्तीच्या युगांतील साधनांचाहि उपयोग भारताला करून घ्यावयाचा आहे. ह्या कामीं अणुशक्तीचा उपयोग कितपत होईल असा प्रश्न साहजिकच उद्भवतो. ब्रिटनमधील सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ सर जॉन कॉक क्रॉफ्ट ह्यांच्या मतानें भारतामधील आर्थिक प्रगतीला अणुशक्तीच्या शांततामय उपयोगाचें खूप साह्य होऊं शकेल. ट्रॉंबे येथील अणुशक्तिविषयक प्रायोगिक भट्टी ह्या दृष्टीनें फार महत्त्वाची आहे. अणुभट्टीपासून मिळणाऱ्या रेडिओ आयसोटोपसूच्या साह्यानें भारतामधील शेती, उद्योगधंदे व वैद्यक ह्यांच्यांत महत्त्वाचे बदल घडून येण्याची शक्यता आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारतांत अणुशक्तीवर चालणारीं दोन वीज-केंद्रें उभारण्यांत येणार आहेत. त्यांपैकी एक महाराष्ट्रांत उभारण्यांत येणार असून दुसरें दिल्ली-पंजाब भागांत उभारलें जाण्याचें घाटत आहे. ह्या केंद्रांची वीज-उत्पादनाची शक्ति १,५०,००० किलोवॅट असण्याची शक्यता आहे. ह्या भागांत शेती व उद्योगधंदे ह्या दोन्हींच्या बाबतींत औद्योगिक शक्तीचा तुटवडा भासत आहे; तो नव्या केंद्रानें कमी होईल.

---

## खताच्या कारखान्यासाठी अमेरिकेकडून कर्ज

अमेरिकेच्या डेव्हलपमेंट लोन फंडामधून खताचा कारखाना काढण्यासाठी ३ कोटी डॉलर्सचें कर्ज भारतामधील एका कारखान्याला मिळणार आहे. कारखाना उभारण्यासाठी परदेशीय चलनांत जो खर्च करावा लागेल, तो ह्या कर्जांतून भागविण्यांत येणार आहे. हिंदुस्थान केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लि. ह्या कारखान्याला वरील कर्ज देण्यांत येणार असून त्याबद्दलच्या करारावर सह्या झाल्या आहेत. कारखाना भारत सरकारनें पुरस्कार केलेला आहे. कर्जाचा उपयोग अमेरिकेंत यंत्रसामग्री खरेदी करण्यासासाठी करावयाचा आहे. कारखान्यासाठी द्यावयाच्या कर्जाबाबत फंडामार्फत काढण्यांत आलेल्या पत्रकांत असें म्हटलें आहे कीं, भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत शेतीच्या उत्पादनांत ३० ते ३२ टक्के वाढ करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. उत्पादनांत वाढ करण्याचे इतर अनेक मार्ग असले तरी रासायनिक खताचा अधिक उपयोग करणें हा त्यांत एक महत्त्वाचा मार्ग आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाप्रमाणें नत्रयुक्त खताचें उत्पादन हल्लींच्या तिप्पट करावयाचें आहे. फॉस्फेटयुक्त खतांचें उत्पादन ६ ते ७ पटीनें वाढवावयाचें आहे. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर ट्रॉंबे येथें हा संकल्पित कारखाना उभारण्यांत यावयाचा आहे. भारतामधील रासायनिक खतांचें उत्पादन वाढविण्याच्या कामीं खाजगी भांडवलदारांचें सहकार्य घेण्यांत यावें, अशी भारताच्या सरकारची इच्छा आहे. कर्ज देतांना भारत सरकारच्या ह्या इच्छेचा विचार करण्यांत आला. वरील कारखान्याशिवाय खाजगी मालकीच्या आणखी पांच कारखान्यांसाठी जागा सुचविण्यांत आल्या आहेत. त्यांपैकी कांहीं ठिकाणीं कारखाने उभारण्याची तयारी कांहीं अमेरिकन कारखानदारांनीं दाखविली आहे.

---

## आय. ए. एस. श्रेणींतील संख्येंत वाढ

विकास कार्याच्या वाढत्या गरजा विचारांत घेऊन राज्यांना त्यांच्या आय. ए. एस. श्रेणींतील संख्या वाढविण्यास परवानगी देण्याचें ठरविलें आहे. या श्रेणीची १९५८ मधील संख्या १,७३८ होती; आतां ती २,०१० करण्यांत आली आहे. या श्रेणींतील संख्येचा विचार १९५० पासून दर तीन वर्षांनीं पंचवार्षिक योजनांच्या गरजा लक्षांत घेऊन करण्यांत येतो व त्यांत जरूर ती वाढ केली जाते. १९५० मध्यें हीच संख्या ८९७ होती. सुधारलेल्या संख्येनुसार महाराष्ट्र राज्यांत आय. ए. एस. श्रेणींतील संख्या १५५ राहील. प्रतिवर्षीं स्पर्धा-परीक्षा घेऊन या श्रेणींत भरती करण्यांत येते. गेलीं तीन वर्षें प्रतिवर्षीं सुमारें ७० जणांची भरती होत असून पुढील कांहीं वर्षें ती तितकीच होण्याची शक्यता आहे.

---

## पोस्टाचे दर आतां मेट्रिक वजनावर

१ फेब्रुवारी, १९६१ पासून पोस्टाचे दर मेट्रिक वजनावर आधारलेले असतील. पोस्ट कार्ड आणि इनलंड लेटर कार्ड ह्यांच्या दरांत फरक पडणार नाहीं. पाकिटांवर पहिल्या १५ ग्रॅम्स वजनाला १५ नये पैसे आणि पुढील प्रत्येक १५ ग्रॅम्सला १० नये पैसे असा आकार राहील. इतर इनलंड टपालाचे दरहि तोळ्याऐवजी ग्रॅम्सना लागू होतील. १ तोळा म्हणजे ११·६६ ग्रॅम होतात.

---

## कामगारांचा प्रतिनिधि डायरेक्टर होणार

दि असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि. आपल्या डायरेक्टर बोर्डावर कामगारांचा प्रतिनिधि घेण्याचा विचार करीत आहे.

## इंडो-कमर्शिअल बँक आणि पंजाब नॅशनल बँक
### विलिनीकरणांतील अडचणी

दि इंडो-कमर्शिअल बँक तीन महिन्यांपूर्वी बंद पडली. तिला ऑक्टोबरमध्यें दोन महिन्यांचा मोरेटोरियम देण्यांत आला आणि तो डिसेंबरमध्यें एका महिन्यानें वाढविण्यांत आला. आतां तो २४ मार्चपर्यंत पुन: वाढविण्यांत आला आहे. त्या बँकेचें पंजाब नॅशनल बँकेंत विलिनीकरण होणार आहे, परंतु येण्याच्या वसुलीला होणारा विलंब आणि नोकरवर्गाला पंजाब नॅशनल बँकेंत मुरविण्याचा प्रश्न ह्यामुळें प्रत्यक्ष विलिनीकरण लांबणीवर पडलें आहे. ८७ लक्ष रु. ठेवीदारांत वाटायला आजच उपलब्ध आहेत व त्यांतून रुपयांतले सात आणे देणें देतां येईल. पंजाब नॅशनल बँकेची इच्छा ठेवीदारांना रुपयांतले सोळा आणे एकदमच देण्याची असून, १०० लक्ष रुपये "सत्वर वसूल होण्याजोगें" आहेत असें तिचें मत आहे. इंडो-कमर्शिअल बँकेला अवार्ड लागूं नव्हतें; पंजाब नॅशनल बँक ही अवार्डच्या 'अ' वर्गांत आहे. विलिनीकरणाच्या मसुद्याप्रमाणें, इंडो-कमर्शिअलचे सेक्रेटरी वगळून सर्व कर्मचारी पंजाब नॅशनल बँकेंत त्यांच्या मूळ नोकरीच्या अटीवरच सामावून घेतले जावेत आणि तीन वर्षांनीं त्यांचा फेरविचार करून लायक ठरतील त्यांना पंजाब नॅशनलमधील इतर नोकरांच्या बरोबरीचा दर्जा द्यावा, असें आहे. सुमारें ३०० कर्मचाऱ्यांचा हा प्रश्न असून, बहुतेक जणांना ही योजना मान्य आहे. कांहींजण निवृत्त होऊं इच्छितात, तर कांहींना तीन वर्षांनंतरच्या भवितव्याची काळजी वाटत आहे.

### ला. इं. कॉर्पोरेशनची नैरोबी येथील इमारत

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियानें नैरोबी येथें ११५ फूट उंचीची १० मजली इमारत बांधून तिला 'जीवन भारती' असें नांव दिलें आहे. नैरोबींतील ही सर्वांत उंच इमारत आहे.

### स्टेट बँकेच्या डिव्हिडंडमध्यें वाढ

स्टेट बँक ऑफ इंडियाला १९६० मध्यें २१७·५९ लक्ष रु. नफा झाला आणि तिनें प्रत्येक भागावर २२·७५ रु. डिव्हिडंड जाहीर केलें आहे. मागील वर्षीचा नफा १८७·१० लक्ष रु. व डिव्हिडंडचा दर २० रु. होता.

### सेंट्रल बँक ऑफ इंडियाचें सुवर्णमहोत्सवी वर्ष

दि सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या १९६० ह्या सुवर्ण ज्युबिलीच्या वर्षी तिला नफा १३३·०४ लक्ष रु. झाला; १९५९ मध्यें तो ९९·४३ लक्ष रु. होता. बोनससाठी ५१ लक्ष रु. ची योजना केली आहे. डिव्हिडंड १२·६८%+२% ज्युबिली बोनस, असें देण्यांत येईल. बँकेकडील ठेवी १९६० मध्यें १८० कोटी रु. वरून १९८ कोटी रु. वर गेल्या.

### १२ कोटी पौंडांचा ड्राफ्ट

ब्रिटिश फोर्ड मोटर कंपनीचे ऑर्डिनरी भाग घेण्यासाठी अमेरिकन फोर्ड मोटर कंपनीचे वतीनें लॉर्ड हॅम्डन ( लॅझर्ड ब्रदर्स अँड कं. चे ) ह्यांनीं बँक ऑफ इंग्लंडवरचा ११,९५,००,००० पौंड किंमतीचा ड्राफ्ट नॅशनल प्रॉ. बँकेचे मॅनेजर मि. फ्रँक कीले ह्यांच्या हातीं दिला. एवढ्या मोठ्या रकमेचा ड्राफ्ट ह्यापूर्वी कधींहि ग्रेट-ब्रिटनमध्यें देण्यांत आलेला नव्हता.


**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१९००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर २॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३। " |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | " ५ " |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर





किर्लोस्कर
लोखंडी नांगर

भारी, मध्यम प्रतीच्या व रेताड जमीनीच्या सर्वोत्कृष्ट नांगरटीसाठी निरनिराळ्या बनावटीचे लहान मोठे नांगर तयार होतात. आपल्या जमीनीच्या मगदुराप्रमाणे योग्य अशा नांगराची निवड करा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी
(जि सांगली)

## भारताला लागणाऱ्या परदेशीय मदतीचा अंदाज

सॅन् फ्रान्सिस्को येथील कॉमनवेल्थ क्लबांत बोलतांना भारताचे कमिशनर-जनरल फॉर इकानॉमिक अफेअर्स, श्री. बी. के. नेहरू म्हणाले कीं, पुढील दहा वर्षात भारताला दरसाल १०० कोटी डॉलर्सची मदत श्रीमंत देशांकडून मिळणें जरूर आहे. एक स्वतंत्र व लोकशाहीनिष्ठ राष्ट्र म्हणून जगण्यासाठी भारताला अशी मदत मिळणें फार अगत्याचें आहे. हल्लीं भारतामधील दरडोई उत्पन्नाची वार्षिक वाढ १·५ टक्के आहे. ती दरसाल ५ टक्क्यांपर्यंत झाली पाहिजे. हें घडवून आणावयाचें असेल तर येत्या दहा वर्षात ५,००० कोटी डॉलर्स भांडवल गुंतवावें लागेल. भारत स्वत: ४,००० कोटी डॉलर्स उभारूं शकेल, पण बाकीचे १,००० कोटी डॉलर्स भारताला परदेशांकडूनच मिळवावे लागतील. गेल्या दहा वर्षात भारतानें आपल्या अर्थव्यवस्थेंत २,२०० कोटी डॉलर्स गुंतविण्यांत यश मिळविलें आहे. ह्या गुंतवणुकीमुळें दरडोई वार्षिक उत्पन्नाचा आकडा ६९ डॉलर्सवरून ७० डॉलर्सपर्यंत आला आहे. अर्थात् अमेरिकेच्या तुलनेनें हें उत्पन्न अगदींच कमी आहे. अमेरिकेंतील वार्षिक दरडोई उत्पन्न २,७०० डॉलर्स इतकें होण्याच्या बेतांत आहे. जगांतील बहुतेक अल्प विकास झालेल्या देशांची आर्थिक प्रगति बिगर-लोकशाही राज्यपद्धतीनें झाली आहे. ह्याला अपवाद म्हणजे अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलिआ हे देश होत. कांहीं कम्युनिस्ट देशांतून आर्थिक प्रगतीचा वेग कल्पनातीत आहे. पण भारताला त्यांच्याशीं स्पर्धा करावयाची नाहीं व तशी ती करताहि येणार नाहीं. भारत गरीब देश आहे. व्यक्ति-स्वातंत्र्य टिकविण्यासाठी द्रुतगतीच्या आर्थिक प्रगतीचा त्याग करण्याची त्याची तयारी आहे. पण, अशा त्यागाला सुद्धां कांहीं मर्यादा आहेत; त्या ओलांडल्या तर आर्थिक प्रगतीचा गाडा रुतून बसण्याची शक्यता आहे.

---

## नैसर्गिक वायूच्या उपयोगानें नवे कारखाने

आसामच्या ईशान्य कोपऱ्यांत असलेल्या लखीमपूर जिल्ह्यांत नैसर्गिक वायूचा सांठा मोठ्या प्रमाणावर आहे. ह्या वायूचा उपयोग करून पुढील पांच वर्षांत बऱ्याच प्रकारचे उद्योगधंदे काढण्यांत येणार आहेत. ह्या कामासाठी आसामच्या सरकारनें एका फ्रेंच कंपनीचा सल्ला घेतलेला आहे. १९६४ पासून दरसाल ५ कोटी घनफूट नैसर्गिक वायु मिळण्यासारखा आहे. त्याची व्यवस्था व वांटप करण्याचें काम एका फ्रेंच कंपनीला देण्यांत आलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची अखेर होण्यापूर्वी नैसर्गिक वायूचा उपयोग करून घेणाऱ्या नव्या उद्योगधंद्यांत ४५ कोटी रुपये गुंतविले जातील. नव्या उद्योगधंद्यांत कांहीं कारखाने खाजगी मालकीचे व कांहीं सार्वजनिक मालकीचे असतील. गोहाटी येथील तेलाचा कारखाना सुरू झाल्यावर ह्या वर्षाच्या अखेरीपासूनच नैसर्गिक वायु उपलब्ध होऊं लागेल. पण त्याच्या वाटपासाठी स्वतंत्र कारखानाच फ्रेंच कंपनीला काढावा लागेल. कारखान्याची उभारणी होण्यास १९६४ साल उजाडणार असा अंदाज आहे. एकूण ५ कोटी घनफूट नैसर्गिक वायूपैकीं ९० लाख घनफूट वायूचा उपयोग रासायनिक खतें तयार करण्यासाठी केला जाईल. खताचा कारखाना भारत सरकार काढणार असून त्यासाठी १६ कोटी रुपये भांडवल लागेल. ५० लाख घनफूट नैसर्गिक वायूचा उपयोग आसाम राज्य सरकार ५०,००० किलोवॅट वीज निर्माण करण्याकडे करील. ह्या वीजनिर्मिती केंद्राला ९ कोटी रुपये खर्च येणार आहे. उरलेला नैसर्गिक वायु खाजगी उद्योगपतींना पुरविण्यांत येईल. त्याचा उपयोग करून खाजगी मालकीच्या विभागांत कृत्रिम रबराचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. त्याशिवाय प्लॅस्टिकचाहि एक कारखाना काढण्यांत येईल. खाजगी कारखान्यांना परदेशी कंपन्यांचें साह्य मिळालें आहे.

---

## साखर कारखान्यांच्या जमिनीवरील कमाल मर्यादा

महाराष्ट्र राज्य सरकारनें राज्यांतील जमीनधारणेबाबतचें नवें बिल प्रसिद्ध केल्यापासून त्यासंबंधीं निरनिराळ्या संबंधित गटांच्या व संस्थांच्या प्रतिक्रिया जाहीर होत आहेत. खाजगी साखर कारखान्यांच्या जमिनीलाहि धारणेची कमाल मर्यादा लागू करण्यांत आलेली आहे. खाजगी साखर कारखान्यांच्या विस्तीर्ण ऊंस-शेतीवर काम करणाऱ्या तंत्रज्ञांची व शेतकी अधिकाऱ्यांची एक खास बैठक श्रीरामपूर येथें नुकतीच भरविण्यांत आली होती. बैठकींत जमीनधारणा विधेयकाविषयीं महाराष्ट्र सरकारला एक निवेदन पाठविण्याचें ठरलें आहे. बैठकीचें अध्यक्षस्थान श्री. गंगाधर ओगले ह्यांनीं स्वीकारलेलें होतें. श्री. ओगले एक प्रसिद्ध कामगार पुढारी असून साखरेच्या धंद्यांतील कामगारांची वेतनश्रेणी ठरविण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें जें वेजबोर्ड नेमलें होतें त्याचे ते एक सभासद होते. बैठकींत महाराष्ट्र सरकारच्या जमीनधारणा बिलाविषयीं व त्यामुळें साखरेच्या धंद्यावर होणाऱ्या परिणामाविषयीं चर्चा करण्यांत आली. बैठकी-साठीं निरनिराळ्या ठिकाणाहून ५० प्रतिनिधी आले होते. जमीनधारणा विधेयकाच्या २८ व्या कलमाचा अर्थ अध्यक्ष श्री. ओगले ह्यांनीं स्पष्ट करून सांगितला. महाराष्ट्रांतील साखरेचा धंदा हा राष्ट्रीय महत्त्वाचा असल्यामुळें खाजगी मालकीच्या कारखान्यांची जमीनवाटपासाठी काढून घेण्यांत येऊं नये; सध्यांची कारखान्यांची उसाची शेती ही एक अभिमान वाटण्या-सारखी बाब आहे; राष्ट्रीय उत्पादनाच्या दृष्टीनें ती तशीच टिकविण्यांत आली पाहिजे; असा सूर बैठकीमधील चर्चेत दिसून आला. खाजगी कारखान्यांची कमाल जमीनधारणेपेक्षा अधिक असलेली शेती सरकारी मालकीची करावी; पण तिची प्रत्यक्ष व्यवस्था मात्र कारखान्यांकडेच ठेवावी, अशा सूचना करण्यांत येत आहेत.

---

## प्लॅझमा काढून घेऊन रक्त परत !

रक्तदान करणारांना त्यांनीं दिलेल्या रक्तांतला प्लॅझमा काढून घेऊन रक्त परत देण्याची पद्धत वॉशिंग्टन येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थनें सुरू केली आहे. जरूरीच्या वेळीं प्लॅझमाचा पुरवठा त्यामुळें ३० पट वाढवितां येणें शक्य होईल. रक्तदान करणाऱ्याला आतां दर दोन महिन्यांनीं एक पाइंट रक्त देतां येईल, आणि त्यापासून अर्धा पाइंट प्लॅझमा उपलब्ध होईल.

---

## बॉंबे बँकर्स क्लिअरिंग हाउस

बॉंबे बँकर्स क्लिअरिंग हाउसमधून १९६० मध्यें ४४,९०,३२,४७,००० रु. च्या १,९२,९०,१२३ चेक्सचें क्लिअरिंग झालें. १९५९ मध्यें ४०,७५,३१,९४,००० रु. च्या १,७२,५५,०३० चेक्सचें क्लिअरिंग झालें होतें. प्रत्येक चेकची सरासरी रक्कम १९५९ मध्यें २,३२८ रु. होती, ती १९६० मध्यें २,३६२ रु. झाली.

## मुंबई राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., पुणें

### ३०-६-१९६० अखेरच्या वर्षातील उपयुक्त कार्य

मुंबई राज्याचें विभाजन होणेपूर्वी एकूण १८ सभासद कारखानेसंघाचे सभासद होते. गुजरात राज्यांतील तीन सहकारी साखर कारखान्यांनीं स्वतंत्र संघ स्थापन केला व त्या राज्यांतील सहकारी साखर कारखाने त्या संघाचे सभासद झाले असल्यामुळें आतां संघाचे १५ कारखाने सभासद आहेत. महाराष्ट्र राज्यांतील १३ कारखान्यांचें उत्पादन सुरू आहे. कृष्णा सहकारी साखर कारखान्यानें नवीन मशिनरीची ऑर्डर नोंदवली असून कारखाना-उभारणीचे कामास सुरुवात झाली आहे. तो कारखाना सन १९६०-६१ चे हंगामांत गळीतास सुरुवात करील अशी अपेक्षा आहे. अहवालाचे सालांत सभासद कारखान्यांनीं एकूण १६,२०,४८८ टन उसांचें गळीत करून एकूण १,८९,१७२ टन साखर उत्पादन केली. गतवर्षींचे हेच आंकडे अनुक्रमें ११,९१,७९३ टन व १,३४,१२० टन असे होते.

अहवालाचे सालांत गळिताचा हंगाम यशस्वी रीतीनें पार पडला व दर एकरीं उसांची आवक व साखरेचा उतारा समाधानकारक होता. सभासद कारखाने आपले शेतकी खात्याकडून उसाची प्रत सुधारण्याचा प्रयत्न करीत आहेत. कृष्णा सहकारी साखर कारखान्यास मशिनरी मिळाली असून त्याबाबत करारनामे व इतर गोष्टींबाबत संघानें जरूर ती व्यवस्था केली. अहवालाचे सालांत आपले राज्यांत नवीन पांच सहकारी साखर कारखान्यांस औद्योगिक परवाने मिळाले असून मशिनरीची ऑर्डर देणेबाबत वाटाघाटी चालू आहेत. वरील पांच कारखान्यांपैकीं दूधगंगा वेदगंगा हा पूर्वींच रजिस्टर झालेला कारखाना असून मशिनरीची ऑर्डर देणेबाबत प्राथमिक वाटाघाटी सुरू झाल्या आहेत.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें नवीन कारखाने अस्तित्वांत यावेत व जेथें जेथें शक्यता असेल तेथें ते सहकारी तत्त्वावर निघावेत या उद्देशानें संघानें एक उपसमिति नेमली असून अशा मागणीबाबत जरूर ती माहिती मिळवून सरकारकडे निवेदन करावें असें ठरविलें आहे. चालू सहकारी कारखान्यांस त्यांची उत्पादन-मर्यादा वाढवून मिळावी यासाठी संघानें जरूर तें मार्गदर्शन केलें असून मोठ्या आनंदाची गोष्ट ही कीं, बहुतेक सभासद कारखान्यांस अशा तऱ्हेची जरूर ती परवानगी मिळाली आहे.

### तंत्रविषयक सल्लागारांमार्फत कार्य

अहवालाचे सालांत मुख्यतः तंत्रविषयक सल्लागारामार्फत दोन प्रकारचें कार्य करण्यांत आलें:—

(१) पहिलें असें कीं, जे कारखाने सुरू झाले आहेत त्यांची कार्यक्षमता वाढविण्याचे दृष्टीनें सल्लामसलत देणें व आवश्यक ते सुटे भाग आयात करणें व आवश्यक त्या सुधारणा करण्याचे प्रयत्न करणें.

(२) जे कारखाने उभारणीच्या अवस्थेंत होते त्यांचें काम ठराविक वेळेंत करून घेणें; हंगाम वेळेवर सुरू करणें व उभारणीच्या कामांतील अडचणी दूर करणें.

राज्य सरकारनें उसाचें चिपाडाचा उपयोग कार्डबोर्डसारख्या वस्तू निर्माण करण्याकडे करतां येईल काय याबद्दल समिति नेमल्याचा उल्लेख मागील अहवालांत आहेच. समितीचें काम पूर्ण झालें असून त्यांनीं आपला अहवाल सरकारकडे सादर केल्याचें समजतें. याबाबत मध्यवर्ती सरकारकडूनहि जोराचा विचार चालू असलेचें समजतें. साखर कारखान्यांचे दृष्टीनें महत्त्वाचा मुद्दा असा कीं, उसाचे चिपाडाचे ऐवजीं स्वस्त असें जळण हमखास उपलब्ध होईल काय व त्यासाठी काय उपाययोजना करणें जरूर आहे.

सरकारनें नगर जिल्ह्यांत, चितळी येथें डिस्टिलरी काढण्याचा संकल्प केला आहे व त्याप्रमाणें कामास सुरुवात झाली आहे. सर्व काम संपूर्ण होऊन अहवालाचे सालांत कारखान्याचे उत्पादनास सुरुवात होईल अशी अपेक्षा होती. नगर जिल्ह्यांतील सहकारी साखर कारखान्यांनीं मळीवाहतुकीची सर्व तयारी केली होती; परंतु चितळी डिस्टिलरी सुरू न झालेनें नगर भागांतील सहकारी साखर कारखान्यांस बऱ्याच अडचणी उभ्या झाल्या आहेत. संघानें त्याबाबत सरकारचें लक्ष वेधलें असून मळी परदेशीं पाठविण्याची शक्यता आहे किंवा कसें, याबद्दलहि प्रयत्न चालविले आहेत.

### सामुदायिक खरेदी

संघाचे उद्देशांपैकीं सभासद कारखान्यांसाठी लागणारा माल खरेदी करावा हा एक उद्देश आहे. त्याप्रमाणें ज्या मालासाठी आयात परवाने आवश्यक आहेत अशा मालाची खरेदी संघाकडून केली जाते. इतर मालाची भरपूर मागणी आलेस त्या कारखान्यांसाठी तो माल खरेदी करण्याचें धोरण आहे. माल खरेदीसाठी निरनिराळ्या फर्मसूकडून भाव मागविले जातात व उपसमितीच्या सल्ल्यानें व मान्यतेनें खरेदीची व्यवस्था केली जाते. अहवालाचे सालांत खालीलप्रमाणें सभासद कारखान्यांसाठी माल खरेदी करण्यांत आला.

| | |
|---|---|
| (१) ट्रिपल सुपर फॉस्फेट | ३८० टन |
| (२) डायड्रोसल्फाईट ऑफ सोडा | ३० टन |

उत्पादक सभासदांस उत्तम बीं-बियाणें मिळणें तसेंच योग्य वेळीं भरपूर कर्जपुरवठा उपलब्ध होणें व खताचा पुरवठा होणें यांवर चांगल्या उसाचें उत्पादन व साखर कारखान्यांची यशस्विता अवलंबून आहे. शेती व पीक कर्ज समितीनें कर्जपुरवठ्यासंबंधीं मुंबई राज्य सहकारी बँकेचे चालक व सहकारी खात्याचे रजिस्ट्रार यांचबरोबर चर्चा करून सहकारी साखर कारखान्यांच्या उत्पादक सभासदांस योग्य वेळीं भरपूर कर्ज पुरविलें जावें याची आवश्यकता पटवून दिली व त्याप्रमाणें पैसा पुरविणाऱ्या सहकारी बँकेकडून कर्ज पुरविण्याची व्यवस्थाहि झाली आहे. महाराष्ट्र राज्य सरकारकडून रासायनिक खतेंहि सभासद कारखान्यांस त्यांच्या उत्पादक सभासदांस पुरविण्यासाठी दिलीं जात आहेत. वरील सर्व प्रयत्नांमुळें अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं, कीं साखर कारखान्यांस उत्तम उसाचा पुरवठा होऊन उसाचे टनेजमध्यें आवश्यक ती वाढ होईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा नफा

दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. ला ३१-१२-१९६० असेरच्या वर्षी, पूर्वीच्या वर्षातील शिल्लक रु. १८,८२,५६०=०७ धरून आणि कराची तरतूद करून रु. १,५१,८७,४७०=९६ निव्वळ नफा झाला. त्याचा विनियोग खालीलप्रमाणें करण्यांत आला आहे:—

| | |
|---|---|
| प्रत्येक भागावर रु. २=१० अॅड-इंटेरिम डिव्हिडंड करपात्र ३०-६-६० असेरच्या सहामाहीसाठी (निव्वळ रु. १=४७) | रु. २६,४६,०००=०० |
| स्टाफ ग्रॅच्युइटी फंड | रु. १०,००,०००=०० |
| कॉंटिन्जन्सी फंड | रु. ८,००,०००=०० |
| स्टाफला बोनस, स्पेशल ज्युबिली बोनस धरून | रु. ५१,००,०००=०० |
| | रु. ९५,००,०००=०० |

उरलेल्या रु. ५६,४१,४७०=९६ चा खालीलप्रमाणें विनियोग करावा, अशी शिफारस डायरेक्टर बोर्ड करणार आहे:-

| | |
|---|---|
| ३१-१२-६० असेरच्या सहामाहीसाठी प्रत्येक भागावर रु. २=५० फायनल डिव्हिडंड करपात्र म्हणजे सबंध वर्षाचे १२·८८% निव्वळ डिव्हिडंड होतें. | रु. ३१,५०,०००=०० |
| ज्युबिली बोनस, २% | रु. ६,३०,०००=०० |
| पुढील हिशेबांत वर्ग | रु. १०,६१,४७०=९६ |
| | रु. १,५१,८७,४७०=९६ |

## कंपन्यांच्या शाखांच्या हिशेबाची तपासणी

कंपन्यांच्या शाखांच्या हिशेबाच्या तपासणीसंबंधांतील कंपनी (अमेण्डमेण्ट) ॲक्टांतील तरतुदींची माफी कंपन्यांना मिळावयाची झाल्यास त्याकरितां डिपार्टमेंट ऑफ कंपनी लॉ ॲडमिनिस्ट्रेशननें नियम तयार केले आहेत. 'दी कंपनीज् (ब्रँच ऑडिट एक्झेम्शन) रूल्स' या नांवाचे हे नियम आतां प्रसिद्ध झाले आहेत. कोणत्याहि स्वरूपाचें उत्पादन, प्रक्रिया किंवा व्यापार करणाऱ्या कंपनीची शाखा असल्यास, तिची आर्थिक उलाढाल संबंधित आर्थिक वर्षांत सरासरीनें २ लाख रुपये वा कंपनीच्या एकूण (सर्व शाखांच्या व इतर कचेऱ्यांच्या) उलाढालीच्या २ टक्के यांपैकी जी जास्त असेल त्याहून अधिक नसल्यास त्या शाखेच्या बाबतींत हिशेबाच्या तपासणीसंबंधांतील सदर कायद्याचें २२८ कलम लागूं केलें जाणार नाहीं, असें या नियमांत म्हटलें आहे. इतर सर्व प्रकरणीं हिशेब तपासणी माफ करण्या-संबंधांत मध्यवर्ती सरकारकडे कारणें देऊन ठराविक नमुन्यांत अर्ज सादर करावा लागतो. अशी माफी मंजूर केल्यास सरकार याबाबतच्या आपल्या हुकुमांत या विषयींच्या अटी व मुदत नमूद करील. सदर कायद्यांतील तरतुदींमुळें मोठ्या कंपन्यांना आपल्या यंत्रणेंतच : अंतर्गत हिशेबतपासणीची भक्कम पद्धत निर्माण करण्यास उत्तेजनच मिळेल अशी उमेद वाटते. उत्पादन, प्रक्रिया किंवा व्यापार याव्यतिरिक्त व्यवहार करणाऱ्या कंपन्यांनीं ठराविक मुदतीनें आपल्या शाखांच्या हिशेबाची तपासणी करण्याची व्यवस्था उत्तम व समाधानकारकपणें केली असेल तर अशी माफी मिळूं शकेल.

## राणीच्या मानपत्र समारंभाचें ऐतिहासिक महत्त्व

इंग्लंडची राणी एलिझाबेथ आणि तिचे पति ड्यूक ऑफ एडिंबरो ह्यांचा दिल्ली येथें रामलीला मैदानावर ता. २८ रोजीं दिल्लीच्या नागरिकांतर्फे सत्कार करण्यांत आला. ह्या समारंभाला थोडेंसें ऐतिहासिक महत्त्व आहे. ५० वर्षांपूर्वी राणीचे आजोबा, पांचवे जॉर्ज ह्यांना दिल्ली नगरपालिकेनें मानपत्र दिलें होतें. त्या समारंभांत भाषण करतांना बादशहा पांचवे जॉर्ज ह्यांनीं हिंदुस्थानची राजधानी कलकत्त्याहून दिल्ली येथें आणल्याची घोषणा केली होती. राणीच्या स्वागतासाठी होणाऱ्या समारंभाच्या वेळीं कुतुबमिनार ह्या सुप्रसिद्ध मनोऱ्याची एक हस्तिदंती प्रतिकृति दिल्लीच्या नागरिकांतर्फे भेट म्हणून देण्यांत आली आहे. खुद्द कुतुबमिनार पाहण्याची इच्छा राणीनें व्यक्त केलेली आहे. हस्तिदंताच्या वस्तू तयार करणाऱ्या एका कुशल कलाकाराकडून कुतुबमिनाराची प्रतिकृति करण्यांत आली आहे. ह्या कलाकृतीसाठी २७ इंच लांबीचा हत्तीचा सुळा मिळविण्यांत आला आहे. दिल्लीच्या काश्मीर दरवाजाजवळ असलेल्या सेंट जेम्स चर्चमध्यें राणी ता. २९ रोजीं प्रार्थनेला गेली होती. हें चर्च १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत बांधलेलें असून दिल्लींतील सर्वांत जुनें आहे. हें बांधण्याची शपथ कर्नल स्किनर ह्या लष्करी अधिकाऱ्यानें रणांगणावर जखमी झाल्यावर घेतली होती. कर्नल स्किनरचा जन्म १७७८ सालीं झाला. त्याचा बाप स्कॉटिश होता व आई रजपूत होती. कर्नल स्किनर हा पंजाबमध्यें १८४१ सालीं आपल्या वयाच्या ६३ व्या वर्षीं वारला. त्यानंतर त्याचें शव उत्तरक्रियेसाठी दिल्लीला आणण्यांत आलें व त्यानें बांधलेल्या चर्चच्या आवारांतच पुरण्यांत आलें. कर्नल स्किनरचा पणतु ता. २९ रोजीं राणीच्या स्वागतासाठी मुद्दाम हजर राहिला होता.

## परकीय हुंडणावळ नियमन कायद्याचा भंग

मध्यवर्ती अर्थ खात्याच्या अंमलबजावणी विभागानें सप्टेंबर ते डिसेंबर, १९६० या कालांत परकीय हुंडणावळ नियमन कायद्याचा भंग केल्याचीं १२५ प्रकरणें निकालांत काढलीं. ह्या कायद्याचा भंग केलेले फर्म्सचे मालक, भागीदार, कंपन्या, इत्यादींना एकूण २८,९०५ रुपये दंड केला.



वेडेकर
मसाले, लोणची
व पापड
आपल्या जेवणांत
विशेष लज्जत
आणतील
वापरून पहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर,
कोट व परळ.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.